**नियमित दिवाणी दावा क्र.** - १२३/२०१४

केदु पुंजा ठाकरे व इतर . . . वादी

**विरूध्द**

चंद्रकला अशोक ठाकरे व इतर . . . प्रतिवादी

**निशाणी क्र. ६४ वरील आदेश**

(घोषित दिनांक - ११/०६/२०१८)

१. प्रस्तुतच्या कामी प्रतिवादी क्र. १ ने तीच्या कैफियातीसोबत उलट दावा केला असून त्या सर्व मागण्या या दाव्यात चालविणे योग्य ठरणार नसल्याने तीला स्वतंत्र दावा दाखल करण्याचा आदेश देण्यात यावा असा अर्ज सादर केलेला आहे.

२. दावा विचारात घेण्यापूर्वी खालील वंशवृक्ष विचारात घेणे योग्य ठरेल -

पुंजा (मयत)

रामकृष्ण (मयत) केदु (वादी क्र. १) दगुबाई गुंताबाई मंदाबाई (प्रतिदाव्यातील प्रतिवादी क्र. १० ते १२)

मंजुळाबाई

अशोक (प्र.वादी क्र. ६) दत्तु ताराबाई विमलबाई शकुंतला कुसुम (प्रतिदाव्यातील प्रतिवादी क्र. ५ ते ९)

चंद्रकला (पत्नी) (प्रतिवादी क्र. १)

आत्माराम (प्र.वादी क्र. २) लक्ष्मण (प्र.वादी क्र. ३) वंदना (प्र.वादी क्र. ४) सविता (प्र.वादी क्र. ५)

३. प्रतिवादी क्र. १ ही प्रतिवादी क्र. ६ ची पत्नी असून प्रतिवादी क्र. २ ते ५ हे प्रतिवादी क्र. १ व ६ यांची मुले व मुली आहेत. एका अर्थाने रामकृष्ण यांच्या वारसांच्या कुटुंबियासोबत वादीचा एका अर्थाने कुठलाही संबंध नाही. ते केवळ रामकृष्ण चे भाउ आहेत.

४. अशा परिस्थितीत प्रतिवादी क्र. १ याने प्रतिवादी क्र. ६ या तीच्या पतीविरूध्द येवला येथील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी यांच्या न्यायालयात अन्नवस्त्राच्या रक्कम मिळण्यासाठी किरकोळ अर्ज क्र. -१५७/१९९३ दाखल केला होता व सन १९९४ मध्ये त्याचा निकाल होवून

त्या आधारावर वसुली अर्ज क्र. - ९४/१९९५ त्याच न्यायालयात दाखल केला होता व त्या न्यायालयात प्रतिवादी क्र. ६ च्या हिश्याची मिळकत जप्ती होण्याबाबत आदेश महाशय तहसिलदार यांना दि. २९/०९/२००१ रोजी पाठविण्यात आले होते व गट क्र. - १८०, २०३, २०७ व २१६ यावर नोंद क्र. ३१८ अन्वये मालमत्ता जप्त अशी नोंद घेण्यात आली होती व त्यासंदर्भात वादींना कुठलीही नोटीस देण्यात आलेली नव्हती. प्रत्यक्षात गट क्र. २०३/१ व २१६/१ ह्या वाटपाणे वादीच्या ताब्यात आलेल्या आहेत. त्या मिळकतींशी प्रतिवादी क्र. ६ अथवा १ चा कुठलाही हितसंबंध नाही. तरीदेखील त्या मिळकती जप्त झाल्या आहेत. त्यामुळे वादींनी सदरचा दावा दाखल केला असून त्यांच्या मिळकतीचा मालकीचा हक्क घोषित करण्यासाठी तसेच प्रतिवादी क्र. १ ते ६ यांचा सदर मिळकतीशी कुठलाही संबंध नसल्याचे घोषित होवून मिळण्यासाठी सदरचा दावा दाखल केलेला आहे.

५. प्रतिवादी क्र. १ ते ५ यांनी **निशाणी क. १८** अन्वये त्यांची कैफियत दिलेला आहे. शिवाय, **निशाणी क. २०** अन्वये इतर प्रतिवादीविरूध्द उलट दावा दाखल केला असून त्यात प्रतिवादी क्र. ५ ते १२ यांनादेखील प्रथमतः पक्षकार केलेले आहेत. प्रत्यक्षात **निशाणी क. १८** च्या कैफियतमध्ये उलट दावा नमुद करणे आवश्यक असतांना त्यावेळी प्रतिवादींनी स्वतंत्र प्रतिदावा दाखल केलेला आहे व तत्कालीन पिठासिन अधिकारी यांनी त्यावर पुढील आदेश केलेला आहे. त्या उलट दाव्यात प्रतिवादी क्र. १ ते ५ यांनी वाटणी मागितली असून अन्नवस्त्राची रक्कम मिळण्यासाठी अर्जदेखील केलेला आहे. तथापि, **निशाणी क. ६६** वर प्रतिवादी क्र. १ तर्फे स्वतंत्र अर्ज देण्यात आला असून त्यात त्यांनी सदरच्या अन्नवस्त्राची केलेली मागणी कमी करण्याची विनंती केली असून तो अर्ज मान्य करण्यात आलेला आहे. स्वाभाविकच, प्रतिवादींचा वाटणीसाठी असणारा उलट दावादेखील मेन्टेनेबल आहे. दाव्यात वाटणी झाली आहे असे वादींचे कथन असल्यास त्याला महाशय प्रथम वर्ग न्यायंदाधिकारी, येवला यांनी केलेल्या आदेशाविरूध्द त्याच न्यायालयात अथवा वरिष्ठ न्यायालयात त्या वाटणीच्या आधारावर दाद मागता येवू शकते. शिवाय प्रतिवादी क्र. १ हिने अन्नवस्त्र मिळण्याबाबतची मागणी **निशाणी क. ६६** च्या अर्जाच्या आदेशान्वये रद्द केली असल्यामुळे व अन्य मागण्या प्रतिवादींना उलट दाव्यात मागता येवू शकत असल्यामुळे सदरचा अर्ज **निशाणी क. ६४** रद्द करणे योग्य ठरणार आहे. त्यामुळे मी खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे -

## <u>आदेश</u>

**निशाणी क्र. ६६** वरील अर्ज मान्य झाला असल्यामुळे **निशाणी क्र. ६४** चा अर्ज रद्द करण्यात येत आहे.

दिनांक - ११/०६/२०१८

(**के. जी. चौधरी**)
दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, चांदवड.

**<u>नियमित दिवाणी दावा क्र.</u>** - १२३/२०१४

केदु पुंजा ठाकरे व इतर . . . वादी

**<u>विरूध्द</u>**

चंद्रकला अशोक ठाकरे व इतर . . . प्रतिवादी

**<u>निशाणी क्र. ६६ वरील आदेश</u>**

<u>(घोषित दिनांक - ११/०६/२०१८)</u>

प्रतिवादी क्र. १ हिने या दाव्यात अन्य प्रतिवादींविरूध्द अन्नवस्त्राची रक्कम मिळावी म्हणून देखील मागणी केली असून ती मागणी रद्द व्हॉवी म्हणून सदरचा अर्ज दिलेला आहे. स्वाभाविक, ऑर्डर २ रूल ४ प्रमाणे वाटणीच्या मागणीसोबत अन्नवस्त्राची रक्कम मिळण्याची मागणी मागता येवू शकत नसल्यामुळे त्यांचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. त्यामुळे मी खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे -

**<u>आदेश</u>**

१. निशाणी क्र. ६६ वरील अर्ज मान्य करण्यात येत असून प्रतिवादी क्र. १ ते ५ यांनी दाखल केलेला उलट दाव्यामधील प्रतिवादी क्र. १ ने मागितलेली अन्नवस्त्राची मागणी निशाणी क्र. २० मधिल परिच्छेद क्र. १४(ड) रद्द करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी क्र. १ ते ५ यांनी मुळ कैफियत निशाणी क्र. १८ व उलट दावा निशाणी क्र. २० हे स्वतंत्र दाखल केलेला असल्यामुळे व ते एकत्रितच दाखल होणे अपेक्षित असल्यामुळे प्रतिवादी क्र. १ ते ५ यांनी निशाणी क्र. १८ व २० मध्ये उपरोक्त आदेशाप्रमाणे योग्य तो बदल करून निशाणी क्र. १८ वर एकत्रितरित्या दुरूस्त कैफियत व प्रतिदावा सदर आदेशाच्या १४ दिवसांच्या आत दाखल करावा.

दिनांक - ११/०६/२०१८

(**के. जी. चौधरी**)
दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, चांदवड.